सन २०२६-२७ मधील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर (जिल्हा वार्षिक योजना) चारा उत्पादन कार्यक्रमांतर्गत चारा बियाणे/ ठोंबे वाटप योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये शिथिलता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक डीएएचडी-१४०१७/०१/२०२६-एएच-४ (E-१५४५०९१),
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक ,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२६

<u>वाचा</u> -: १) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यसाय विभागाचा शासन निर्णय (जिल्हा वार्षिक योजना) क्र. डीएएचडी-१४०१७/०१/२०२६-एएच-४ (E-१५४५०९१), दि.०९.०३.२०२६.

(२आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र . जा.क्र. वैरण विकास/एल निनो/१७३०/२०२६, पसं-१४ औंध, पुणे दि. १.१०.२०२६

शासन निर्णय :

शासन निर्णय दि. ०९.०३.२०२६ अन्वये राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (जिल्हा वार्षिक योजना) लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील क्र. ४ (अ) अन्वये वैरण उत्पादन कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना १ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत वैरण उत्पादन घेण्यासाठी १०० टक्के अनुदान तत्वावर रु. ४०००/- किंमतीचे चारा बियाणे व शेतकरी समूह गटासाठी ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत रु. २०,०००/-किंमतीचे चारा बियाणे देण्यात येते. सदर योजना वर्षातून एकदा राबविण्यात येत असल्याने लाभार्थ्यांना वर्षातून एकदाच लाभ मिळणे अभिप्रेत आहे.

सन २०२६-२७ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहिर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त स्थितीमुळे चारा टंचाईच्या गंभीर संकटावर मात करण्यासाठी चारा उत्पादनास प्राधान्य देणे आवश्यक झाले आहे. ही बाब विचारात घेवून शासन निर्णय दि. ०९.०३.२०२६ मधील क्र. ४ (अ) अन्वये वैरण उत्पादन कार्यक्रमांतर्गत चारा बियाणे/ठोंबे वाटपासाठी विहित करण्यात आलेल्या अटी सन २०२६-२७ या वर्षासाठी खालीलप्रमाणे शिथिल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

क्र	शासन निर्णय दि. ०९.०३.२०२६ मधील अटी	शिथिल केलेल्या अटी
१	**अ) वैयक्तिक लाभार्थी** (१) स्वत:चे किमान ३ ते ४ पशुधन	**अ) वैयक्तिक लाभार्थी** (१) पशुधनाची अट सन २०२६-२७ साठी शिथिल करण्यात येत आहे.

	अनुदानाचे स्वरूप १) वैयक्तिक लाभार्थी १०० टक्के अनुदान १ हेक्टरसाठी रु.४०००/- च्या मर्यादेत २) शेतकरी समूह गट १०० टक्के अनुदान ५ हेक्टरसाठी रु.२००००/- च्या मर्यादेत	**अनुदानाचे स्वरूप** १) चारा उत्पादन करण्यासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्यास वैयक्तिक लाभार्थ्यास रु.४०००/- किमतीची बियाणे एकापेक्षा जास्त वेळेस. (पाणीसाठा उपलब्ध असलेला प्रथम लाभाची मागणी नसलेला अर्जदार उपलब्ध नसल्यास) २) चारा उत्पादन करण्यासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्यास शेतकरी समूह गटास रु.२००००/- किमतीची बियाणे एकापेक्षा जास्त वेळेस. (पाणीसाठा उपलब्ध असलेला प्रथम लाभाची मागणी नसलेला अर्जदार उपलब्ध नसल्यास)
३	**लाभाची संख्या -** सर्वसाधारण सदर योजना वर्षातून एकदाच राबविण्यात येत असल्याने लाभार्थ्यांस वर्षातून एकदाच लाभ अभिप्रेत आहे.	**व लाभाची संख्या :-** चारा उत्पादन करण्यासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याची खातरजमा करुन एकापेक्षा जास्त वेळी

वरील शिथिलता ही फक्त सन २०२६-२७ साठी लागू करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) शेतकऱ्याकडे / शेतकरी समूह गटाकडे चाऱ्याच्या उत्पादनासाठी पाणी उपलब्ध असल्याबाबत संबंधित उपायुक्त पशुसंवर्धन यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.
२) प्रथम लाभ घेणाऱ्या इतर अर्जदाराची मागणी नसावी.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेताक २०२६१०१४१०३७१६४५४५ आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A48425584545 24CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.10.14 10:38:46 +05'30'

(नि.भा.मराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
४. मा.विधानसभा /विधान परिषद सदस्य(सर्व)

५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई-३२
६. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२.
७. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२
८. आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व जिल्हाधिकारी
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
११.सर्व जिल्हा उपायुक्त,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
१२.सर्व पालकमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई-३२
१३.निवडनस्ती -पदुम ४